0 6 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराष्ट्राचे समाजशास्त्र समजलेले साहित्यिक

## डॉ. राजन गवस : शिवाजी विद्यापीठात अण्णा भाऊंच्या साहित्यावर परिसंवाद

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ५ : 'महाराष्ट्राचे समाजशास्त्र खऱ्या अर्थाने समजलेले साहित्यिक म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे होते. त्यांच्या साहित्यकृती मिथकांचे पुनरावलोकन करणाऱ्या आहेत. अभ्यासक, संशोधकांनी नव्या सौंदर्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून अण्णा भाऊंच्या साहित्याचे नव्याने संशोधन आणि मांडणी करावी', असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित परिसंवादात बीजभाषण करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस. यावेळी डावीकडून डॉ. प्रभंजन माने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे, सचिन साठे, अक्षय सरवदे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे 'अण्णा भाऊ साठे आणि मानवतावाद' या विषयावरील परिसंवादात त्यांचे बीजभाषण झाले. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. गवस म्हणाले, 'महाराष्ट्राचे समाजशास्त्र हे देशातील अन्य राज्यांपेक्षा खूप वेगळे आहे. येथील समाजांतर्गत असणारी जातीय उतरंड आणि ती निर्माण होण्यामागील कारणमीमांसा कठोरपणे समजून घेतल्याखेरीज ते समजणार नाही. अण्णा भाऊंना हे समाजशास्त्र नेमकेपणाने समजलेले होते. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यामध्ये जागोजागी उमटलेले दिसते. शोषित वर्गाकडे नायक म्हणून पाहण्याची त्यांची दृष्टी त्यातूनच विकसित झालेली होती.'

ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, 'अण्णा भाऊ यांच्या साहित्यामधील मानवतावादी सूत्रे ही प्रेरक स्वरूपाची आहेत. महाराष्ट्राच्या उभारणीची सुधारणावादी दृष्टी त्यांनी आपले साहित्य व कार्यातून दिली.'

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अण्णा भाऊ साठे यांची चरित्रपुस्तिका अध्यासनामार्फत तयार करावी. त्यांच्या साहित्यावर निर्माण झालेल्या चित्रपटांचे संकलन करावे, असे आवाहन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी स्वागत केले. इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले.

### अण्णा भाऊंचे लेखन गोरगरिबांच्या बाजूचे

**'अण्णा भाऊ हे शोषित, उपेक्षित, वंचितांच्या रक्त, अश्रू व घाम यांवर महाकाव्य लिहिणारे महान मानवतावादी साहित्यिक होते', असे ज्येष्ठ विचारवंत डॉ. शरद गायकवाड यांनी सांगितले. अण्णा भाऊंचे नातू सचिन साठे यांनी, अण्णा भाऊंनी गोरगरिबांच्या बाजूने लेखन केले, असे सांगितले. डॉ. धनाजी साठे यांनी अण्णा भाऊंचे साहित्य माणसाला दिशा देणारे ठरले, तर डॉ. उत्तम सकट यांनी अण्णा भाऊंनी आपल्या समग्र साहित्यामध्ये बहुजन समाजाला सामावून घेतल्याचे सांगितले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2025

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित परिसंवादात बीजभाषण करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस. व्यासपीठावर डॉ. प्रभंजन माने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे, सचिन साठे व डॉ. अक्षय सरवदे. (छाया : अर्जुन टाकळकर)

# महाराष्ट्राचे समाजशास्त्र समजलेले साहित्यिक म्हणजे अण्णा भाऊ साठे

## डॉ. राजन गवस; विद्यापीठात एकदिवसीय परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्राचे समाजशास्त्र खऱ्या अर्थाने समजलेले साहित्यिक म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने त्यांच्या जयंतीनिमित्त 'अण्णा भाऊ साठे आणि मानवतावाद' या विषयावरील एकदिवसीय परिसंवादात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. गवस म्हणाले, महाराष्ट्राचे समाजशास्त्र हे देशातील अन्य राज्यांपेक्षा खूप वेगळे आहे. येथील समाजांतर्गत असणारी जातीय उतरंड आणि ती निर्माण होण्यामागील कारणमीमांसा कठोरपणे समजून घेतल्याखेरीज ते समजणार नाही. अण्णा भाऊंना हे समाजशास्त्र नेमकेपणाने समजलेले होते. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यामध्ये जागोजागी उमटलेले दिसते.

शोषित वर्गाकडे नायक म्हणून पाहण्याची त्यांची दृष्टी त्यातूनच विकसित झालेली होती. एका अर्थाने अण्णा भाऊ हे सांगणारे नव्हे, तर रचणारे लेखक होते.

अण्णा भाऊ साठे यांचे नातू सचिन साठे म्हणाले, अण्णा भाऊंना काल्पनिकता कधीच भावली नाही. वास्तविकता आणि प्रामाणिकता हे त्यांच्या समग्र साहित्याचे वैशिष्ट्य आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, अण्णा भाऊ यांच्या साहित्यामधील मानवतावादी सूत्रे ही प्रेरक स्वरुपाची आहेत.

महाराष्ट्राच्या उभारणीची सुधारणावादी दृष्टी त्यांनी आपले साहित्य व कार्यातून दिली. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अण्णा भाऊ साठे यांची चरित्रपुस्तिका अध्यासनामार्फत तयार करण्यात यावी. त्यांच्या साहित्यावर निर्माण झालेल्या चित्रपटांचे संकलनाचे कामही हाती घ्यावे, असे आवाहन केले.

परिसंवादामध्ये ज्येष्ठ विचारवंत डॉ. शरद गायकवाड, डॉ. धनाजी साठे, डॉ. उत्तम सकट यांनी विचार मांडले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी प्रास्ताविक केले. इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले.

0 6 AUG 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरूंचा मोठेपणा, विद्यार्थिनींना उद्घाटनाचा सन्मान

## भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागाच्या सायली यादव आणि निकिता जाधव या विद्यार्थिनींच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्घाटन विद्यार्थिनींच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

भूगोल अधिविभागात नव्याने सुरू करण्यात आलेल्या जिओइन्फॉर्मेटिक्स अभ्यासक्रमांसाठी जागेची आवश्यकता लक्षात घेऊन गतवर्षी ऑक्टोबरमध्ये नूतन विस्तार इमारतीच्या कामास प्रारंभ करण्यात आला. एक वर्ष पूर्ण होण्याच्या आत इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते कोनशिला अनावरण नियोजित होते. तथापि, जिओइन्फॉर्मेटिक्स विषयाच्या सायली यादव आणि निकिता जाधव या विद्यार्थिनींना बोलावून कुलगुरूंनी त्यांच्या हस्ते कोनशिला अनावरण केले. या इमारतीमध्ये वर्गखोल्यांबरोबरच थ्री-डी व्हिज्युअलायझेशन, ड्रोन टेक्नॉलॉजी यांसह जिओइन्फॉर्मेटिक्सशी निगडित प्रयोगशाळाही असणार आहेत. येथे अधिकाऱ्यांसाठी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचाही विद्यापीठाचा मानस आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. गिरीश कुलकर्णी, रणजित यादव, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. मीना पोतदार उपस्थित होते.

06 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूगोल विभागात होणार 'ड्रोन टेक्नॉलॉजी'ची प्रयोगशाळा

## विद्यार्थिनींच्या हस्ते शिवाजी विद्यापीठातील विस्तार इमारतीचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्‌घाटन आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जिओइन्फॉर्मेटिक्स विषयाच्या विद्यार्थिनी सायली यादव आणि निकिता जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या इमारतीत ड्रोन टेक्नॉलॉजी, थ्री-डी व्हिज्युअलायझेशनची अद्ययावत प्रयोगशाळा असणार आहे.

या अधिविभागात नव्याने सुरू केलेल्या जिओइन्फॉर्मेटिक्स अभ्यासक्रमांसाठी जागेची आवश्यकता लक्षात घेऊन गतवर्षी ऑक्टोबरमध्ये नूतन विस्तार इमारतीच्या कामास प्रारंभ करण्यात आला. एक वर्ष पूर्ण होण्याच्या आत इमारतीचे उद्‌घाटन केले. तळमजल्याचे ४०७७ चौरस फूट इतके बांधकाम झाले आहे. उद्‌घाटनाच्या कार्यक्रमात सिव्हिल कंत्राटदार उदय घोरपडे, अनिरुद्ध घोरपडे, विद्युत ठेकेदार श्रीकांत गुजर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, धनश्री शिंदे, मीना पोतदार, विद्या चौगुले, प्रशांत पाटील, अमित कांबळे, विजय पोवार, शिवकुमार घ्याडे, वैभव आरडेकर, जी. बी. मस्ती उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्‌घाटन करताना विद्यार्थिनी. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी.

### म्हणून उभारली विस्तारीत इमारत

भूगोल अधिविभागाच्या मूळ इमारतीमध्ये त्यांचे वर्ग आणि प्रयोगशाळा यासाठी जागेची कमतरता भासत असल्यामुळे नव्या विस्तार इमारतीची उभारणी केली. या इमारतीमध्ये वर्गखोल्यांसह थ्री-डी व्हिज्युअलायझेशन, ड्रोन टेक्नॉलॉजी, जिओइन्फॉर्मेटिक्सशी निगडित अद्ययावत प्रयोगशाळा असणार आहेत. येथे विविध क्षेत्रांतील शासकीय अधिकाऱ्यांसाठी आवश्यकतेनुसार व मागणीनुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचाही विद्यापीठाचा मानस आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2025

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्घाटन करताना विद्यार्थिनी. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. सुहासिनी पाटील आदी.
(छाया : अर्जुन टाकळकर)

# भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे विद्यार्थिनींच्या हस्ते उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागाच्या विद्यार्थिनींच्या हस्ते उद्घाटन झाले. भूगोल अधिविभागात नव्याने सुरू करण्यात आलेल्या जिओइन्फॉर्मेटिक्स अभ्यासक्रमांसाठी जागेची आवश्यकता लक्षात घेऊन गतवर्षी ऑक्टोबरमध्ये नूतन विस्तार इमारतीच्या कामास प्रारंभ करण्यात आला. एक वर्ष पूर्ण होण्याच्या आत इमारतीचे उद्घाटन झाले आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते कोनशिला अनावरण नियोजित होते. तथापि, जिओइन्फॉर्मेटिक्स विषयाच्या सायली यादव व निकिता जाधव या विद्यार्थिनींना बोलावून कुलगुरूंनी त्यांच्या हस्ते कोनशिला अनावरण केले. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी इमारतीमध्ये फीत कापून प्रवेश केला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. मीना पोतदार, डॉ. विद्या चौगुले, डॉ. प्रशांत पाटील, विद्युत अभियंता अमित कांबळे, विजय पोवार, शिवकुमार ध्याडे, वैभव आरडेकर, जी. बी. मस्ती उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 AUG 2025
पुण्यनगरी



क्रांतिकारी शोध

# दिशादर्शक अर्थात चुंबकसूची!

डॉ. व्ही.एन. शिंदे

अमेरिकेच्या शोधाबाबत असे म्हटले जाते की, कोलंबस निघाला होता भारताच्या दिशेने. मात्र, तो दिशा चुकला आणि एका वेगळ्याच देशाला पोहोचला. तो देश म्हणजे अमेरिका. समजा जर कोलंबसचे चुंबकसूचीचे आकलन नेटके झाले असते तर अमेरिका आणखी काही वर्षे जगापासून दूर राहिला असता. तसेच घरातील वयस्कर लोक पूर्वी जंगलातून येताना रस्ता चुकल्याचे आणि आपण रात्रभर चाललो तरी पुन्हा त्याच ठिकाणी आल्याचे अनुभव सांगायचे. याला चकवा असे म्हणत. मारूती चितमपल्ली यांनीही याबाबत लेखन केले आहे. अनेक कथा, कादंबऱ्यांतून आणि चित्रपटांतून अशा प्रसंगाचे वर्णन आपणास पाहावयास मिळते. हे असे घडायचे ते दिशेचे योग्य आकलन न झाल्याने.

आज मात्र दिशा चुकण्याचा प्रश्नच नाही, कारण गुगलबाबा आपल्या सेवेला सज्ज आहे. तो आपल्याला जेथे हवे तेथे घेऊन जातो. मात्र, या गुगलबाबाला तयार करण्यासाठीही दिशा निश्चित करून नकाशे बनवले गेले. त्यामध्ये अचूकता आणली गेली. या सर्वांसाठी उपयुक्त ठरली ती चुंबकसूची अर्थात दिशादर्शक. या दिशादर्शक चुंबकसूचीमुळे मानवाच्या आकांक्षाना पंख फुटले. प्रवास मग तो जमिनीवरचा असो किंवा समुद्रातील, तो सोपा, सुखकर, अचूक झाला चुंबकसूचीमुळे. चुंबकसूचीने मानवाचे पर्यटन वाढवले आणि फुलवलेही. अशा या चुंबकसूचीच्या शोधापासून आजवरच्या प्रवासाचा इतिहास आहे तो सव्वादोन हजार वर्षांचा.

चुंबकसूची किंवा कंपॉस म्हणजे चुंबकाचा वापर करून दिशा निश्चित करण्यासाठी, पृथ्वीवरील अक्षांश रेखांशाचे आकलन करून घेण्यासाठी बनवलेले एक मापन यंत्र आहे. या यंत्राची रचना शक्यतो गोलाकार असे. यामध्ये चार दिशांच्या खुणा असतात. यातील चुंबकसूची ज्या दिशेला स्थिर राहाते, तेथे शून्य डिग्रीचा कोन असतो. तेथून ९० डिग्री उजवीकडे पूर्व, १८० डिग्रीला दक्षिण आणि २७० डिग्रीला पश्चिम दिशा असे चिन्हांकित करण्यात येते. चीनमध्ये हान राजवट असताना ख्रिस्तपूर्व २२० सालापासून या चुंबकसूचीचा इतिहास सुरू होतो तो आजच्या गुगलबाबापर्यंत. अगदी सुरुवातीला असे दिशादर्शक म्हणून नैसर्गिक चुंबकपाषाण वापरत. पुढे अकराव्या शतकात साँग राजवटीत दक्षिण दिशेला तोंड करून पोहणाऱ्या माशांचा शोध लागला. मात्र, हे मासे विशिष्ट भागातच आढळत, त्यामुळे या माशांना सोबत पाण्याची छोटी टाकी घेऊन त्यात ठेवत. याला अर्थातच खूप मर्यादा होत्या. याच कालखंडात शेन कुओ आणि झु यु यांनी चुंबकसूचीच्या वापराचे विवरण दिले आणि चुंबकसूची लोक वापरू लागले. पुढे बाराव्या शतकात अलेक्झांडर नेकम याने युरोपला या चुंबकसूचीचा परिचय करून दिला. ११९० मध्ये चुंबकसूची युरोपमध्ये खलाशी आणि पर्यटक वापरू लागले. १२३२ मध्ये मुस्लिम राष्ट्रांमध्ये चुंबकसूची पोहोचली. मध्य युरोपमध्ये १२६९ मध्ये चुंबकसूचीचा वापर सुरू झाला.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

चुंबकसूचीच्या शोधापूर्वी बहुतांश सर्वच राष्ट्रांमध्ये आकशातील ताऱ्यांचा दिशा निश्चित करण्यासाठी उपयोग करण्यात येत असे. यातील ध्रुव तारा हा सर्वांत महत्त्वाचा. तो आपले उत्तर ध्रुवावरील स्थान कायम टिकवून ठेवतो. मात्र, दिवसा तारे दिसत नसल्याने रात्री अंदाज बांधून ठेवायचा आणि दिवसा प्रवास करायचा असा तो काळ होता. चीनमध्ये समुद्रकाठचा चिखल, पक्ष्यांचे उडणे, वाऱ्याची दिशा अशा अनेक गोष्टींवरून दिशेचा अंदाज बांधत असत. हिंद द्विपकल्पात मात्र ग्रह-ताऱ्यांच्या दिशांवरून कोन निश्चित करून दिशा ठरवण्यात येत असे आणि यामध्ये मोठी अचूकता आली होती. काही राष्ट्रांमध्ये सूर्यावरून दिशा ठरवण्यात येत असे. मात्र, ढगाळ वातावरणात सूर्य दिसत नसे आणि दिशा ठरवणे कठीण होत असे. या सर्वांमध्ये अचूकता आणली ती चुंबकसूचीने.

चुंबकसूचीचा इतिहासही रंजक आहे. या चुंबकसूचीचा वापर सुरुवातीला भविष्य सांगण्यासाठी करण्यात येत असे. नैसर्गिक चुंबकाला माशाचा आकार दिल्यानंतर जाड भाग दक्षिण दिशा दर्शवत असे. दक्षिणेला तोंड करून पोहणाऱ्या माशाप्रमाणे ते दिसत असल्याने त्याला दक्षिणमुखी मासा असेही म्हणत. याचा वापर फेंग शुई याने भविष्य सांगण्यासाठी सुरू केला. टांगलेली अशी चुंबकसूची पृथ्वीच्या चुंबक बलाधारे दक्षिणोत्तर स्थिर रहात असल्याने त्याचा दिशादर्शक म्हणून वापर सुरू झाला. हे कार्यही फेंग शुई यांचेच. मात्र, याचा वापर प्रामुख्याने घराचे बांधकाम करताना दिशा ठरवण्यासाठी, पिकांच्या पेरणीची दिशा ठरवणे, दुर्मीळ हिरे आणि रत्ने शोधण्यासाठी करण्यात येत असे. उत्खननात मिळालेल्या काही चुंबकसूचींचे वय मात्र ख्रिस्तपूर्व १४०० वर्षांपूर्वीचा काळ दर्शवते, त्यामुळे सर्वसाधारण ख्रिस्तपूर्व २०० हा काळ चुंबकसूचीच्या शोधाचा मानला जातो. असे असले तरी त्याहीपूर्वी १२०० वर्षे अगोदरपासून चुंबकसूचीचा वापर होत असावा, असा काही संशोधकांचा अंदाज आहे. या दाव्याबाबत काही संशोधक त्या काळात चुंबकसूची दिशादर्शक म्हणून न वापरता एक शोभेची वस्तू म्हणून वापरत असा प्रतिवाद करतात. मात्र, आजमितीला अकराव्या शतकापासून चुंबकसूचीचा वापर दिशादर्शक म्हणून सुरू झाला, यावर बहुतेकांचे एकमत आहे. असा चुंबकसूचीचा वापर करण्याबाबतचे साहित्य संदर्भ चीनमध्ये ख्रिस्तपूर्व ४०० वर्षे अगोदरचे आहेत. त्यानंतरच्या अनेक ग्रंथात याचा उल्लेख येतो. सोळाव्या शतकात युरोपमध्ये या चुंबकसूचीवर दिर्घकाळ अभ्यास केला तो एका राजवैद्याने. विल्यम गिल्बर्ट हे इंग्लंडच्या राजघराण्याचे डॉक्टर होते. त्यांनी चुंबकसूचीचा अभ्यास करून 'डी मॅग्नेटी' हा ग्रंथ लिहिला. त्यांनी विद्युत ऊर्जेची जगाला खऱ्या अर्थाने ओळख करून दिली. विद्युत आणि चुंबकीय बलांचा परस्परसंबंध असल्याचेही शोधले. त्यांनी चुंबकसूचीला स्थिर ठेवण्यासाठी रचनाही बनवल्या. युद्धावेळी सैन्याच्या हालचाली ठरवताना चुंबकसूचीचा सर्वप्रथम १०४४ मध्ये वापर केल्याचे नोंदीवरून दिसून येते. १२९६ मध्ये समुद्र प्रवासासाठी चुंबकसूची वापरल्याची नोंद आढळून येते. चीनमध्ये चुंबकसूची ही पाण्याच्या भांड्यामध्ये तरंगत ठेवत असत. युरोपमध्ये प्रथमच लाकडी बॉक्समध्ये चुंबकसूची अडकवून ठेवण्यास सुरुवात झाली. अशाप्रकारे चुंबकसूचीचा वापर करण्याचे तंत्र चीनमध्ये जपानमार्फत सोळाव्या शतकाच्या अखेरीस पोहोचले. चीनमध्ये अशा प्रकारचे दिशादर्शक अठराव्या शतकात बनू लागले. तेराव्या शतकापासून समुद्रप्रवासामध्ये चुंबकसूचीचा वापर सुरू झाल्याचे दाखले मिळतात. भारतात जरी ग्रहताऱ्यांचा वापर खगोलशास्त्रासाठी करण्यात येत असला तरी पाश्चात्य राष्ट्रात पेट्रस पेरिग्रीनस यांनी १२६९ मध्ये त्याचा वापर सर्वप्रथम केल्याचे संदर्भ मिळतात. या चुंबकसूचीच्या सहाय्याने विविध देशांचे नकाशे अचूक बनवणे सोपे झाले. त्यापासून पुढे नेमक्या दिशेचे ज्ञान प्राप्त झाले. समुद्र प्रवास, जमिनीवरील प्रवासात नेमक्या ठिकाणी जाता येणे शक्य झाले. पर्यटनाला व्यवसायाचे रूप प्राप्त झाले. अनेक गरीब स्थानिकांना रोजगार तर धनवानांना पर्यटनाचा आनंद चुंबकसूचीमुळे मिळू लागला.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००